श्री. योगेश शिवराम बागडे **आणि** श्री. दिगंबर निवृत्ती चव्हाण

## -: निशाणी क्र. यु-१२ वरील आदेश :-

## (दिनांक २३/०३/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज द्वितीय पक्षकार यांनी दाखल करुन त्यांचे सन २०११ ते सन २०१३ चे हजेरी कार्ड, हजेरी पत्रक व पगार पत्रक या न्यायालयात दाखल करण्याचे आदेश प्रथम पक्षकार यांचेविरुध्द होण्याची विनंती केली आहे. प्रथम पक्षकाराने सदर अर्जावर नि.क्र. सी-१० वर म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

३. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे द्वितीय पक्षकाराने त्यांचे सन २०११ ते सन २०१३ चे हजेरी कार्ड, हजेरी पत्रक व पगार पत्रक या न्यायालयात दाखल करण्याचे आदेश प्रथम पक्षकार यांचेविरुध्द होण्याची विनंती केली आहे. प्रथम पक्षकार यांनी प्रस्तुतच्या अर्जास म्हणणे देवून असे कथन केले आहे की, माहे नोव्हेंबर मध्ये द्वितीय पक्षकाराने पुरावा संपल्याची पुरशीस दिलेली होती व त्यानंतर प्रथम पक्षकार यांचा कैफियत दाखल करण्याचा अर्ज मंजूर झाल्यानंतर द्वितीय पक्षकार यांचा उलटतपास प्रथम पक्षकार यांनी घेतलेला आहे. त्यापूर्वीच दिनांक १३/०२/२०२६ रोजी नि.क्र. यु-१० वर पुन्हा द्वितीय पक्षकार यांनी पुरावा संपल्याची पुरशीस दाखल केलेली आहे. द्वितीय पक्षकार यांचा उलटतपास झालेनंतर प्रथम पक्षकार यांनी अर्जात नमूद केलेली कागदपत्रे दाखल करावीत असा अर्ज द्वितीय पक्षकारास त्यांचा पुरावा संपला असताना दाखल करता येणार नाही त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रथम पक्षकार करीत आहेत.

४. अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम पक्षकार यांना वेळोवेळी संधी दिल्यानंतर त्यांची लेखी कैफियत अभिलेखावर दाखल करुन त्यांनी द्वितीय पक्षकाराचा उलटतपास घेतलेला आहे. द्वितीय पक्षकाराचा उलटतपास पूर्ण झाल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या वतीने दाखल करण्यात आलेला आहे. असे दिसून येते की, उलटतपास पूर्ण झाल्यानंतर द्वितीय पक्षकार यांनी पुरावा बंद पुरशीस

दिलेली नाही. प्रथम पक्षकार यांच्याविरुध्द प्रकरण एकतर्फा चालले असता द्वितीय पक्षकाराने त्याचा पुरावा बंद केलेला आहे. प्रथम पक्षकाराने प्रस्तुतच्या अर्जास दिलेले म्हणणे पाहिले असता असे दिसून येते की, या अर्जान्वये मागणी केलेल्या कागदपत्रांचा ताबा अथवा उपलब्धता प्रथम पक्षकार यांनी नाकारलेली नाही. द्वितीय पक्षकाराने <u>नि.क्र. यु–१०</u> वर त्याचा पुरावा संपलेला आहे व मागील तारखेस दिलेला पुरावा हा शेवटचाच पुरावा समजण्यात यावा अशी पुरशीस दिलेली आहे. सदर दिलेल्या पुरशीसमुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे योग्य व न्यायोचित होणार नाही. द्वितीय पक्षकाराने मागणी केलेली कागदपत्रे प्रस्तुतचे प्रकरण गुणदोषावर न्यायनिर्णयीत करण्याकरिता आवश्यक असल्याने व त्याचा ताबा प्रथम पक्षकार यांनी नाकारलेला नसल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करिता आदेश :–

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रथम पक्षकार यांनी द्वितीय पक्षकाराचे सन २०११ ते सन २०१३ चे हजेरी कार्ड, हजेरी पत्रक व पगार पत्रक या न्यायालयात पुढील तारीख अथवा त्यापूर्वी दाखल करावे.

३. खर्चाबाबत आदेश नाहीत.

Digitally signed by MADHURA ABASAHEB MULIK
Date: 2026.03.23 17:17:38 +0530

(मधुरा आ. मुळीक)
पिठासीन अधिकारी
कामगार न्यायालय क्र.१, कोल्हापूर.

ठिकाण – कोल्हापूर.
दिनांक – २३/०३/२०२६